| CNR No.MHKO200001452023 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | – | ११ | ०४ | २०२३ |
| | नोंदणी तारीख | – | ११ | ०४ | २०२३ |
| | निकाल तारीख | – | ११ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | ०३ | ०१ | ०० |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर**
**यांचे न्यायालयात( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक २२/२०२३.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक २८/ ब.**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– ११ मे २०२६**

पन्हाळा पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं. १२३/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पन्हाळा पोलीस ठाणे,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | | जयवंत निवृत्ती पाटील, व.व.४५ |
| | | रा.देवठाने, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे वकील | | ॲड. श्री. एन. बी. माने |

**भाग–ब**
**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०८.०९.२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०९.०९.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ११.०४.२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ०२.०८.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २४.०६.२०२४ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ११.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जयवंत निवृत्ती पाटील | फौ.प्र.सं. कलम ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस | ०२.०८.२०२३ | भा.द.सं. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सारीका सरदार पाटील | फिर्यादी | ११ |
| २. | आक्काताई बाबासाहेब कांबळे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १६ |
| ३. | बबीता भगवान कांबळे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १७ |
| ४. | सरदार निवृत्ती पाटील | जखमी साक्षीदार | २२ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | निरंक | –– | –– |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| -- | निरंक | -- | -- |

## अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी

### अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १२ | फिर्याद |
| २. | २४ | घटनास्थळ पंचनामा (आरोपीतर्फे मान्य) |
| ३. | २५ | जखमी सारीका सरदार पाटील यांचे एम.एल.सी सर्टिफिकेट (आरोपीतर्फे मान्य) |
| ४. | २६ | जखमी सरदार निवृत्ती पाटील यांचे एम.एल.सी सर्टिफिकेट (आरोपीतर्फे मान्य) |

### ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

### क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ७ | दोषारोप |
| २. | ८ | आरोपीचे निवेदन |
| ३. | २७ | आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन |

### ड. भौतिक वस्तु

| अ.क्रं. | मुद्देमाल अर्टीकल नं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | आर्टीकल अ | एक बांबुचा दांडा अंदाजे एक मिटर (३९ इंच) लांबीचा चार पेरे असलेला त्याला टोकाला अंदाजे १० x ८.५ इंच लांबी रुंदीची लाकडी फळी असलेली जुनी वापरती |

**<u>न्या य नि र्ण य</u>**
**(दिनांक ११ मे २०२६ रोजी घोषित)**

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४,३२३, ५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादीचे पती यांचे देवठाणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या गावात त्यांचे वडीलोपार्जीत माळ नावचे शिवारात शेज जमिन व जनावरांचे गोठा असुन जमिन कसुन ते त्यांचा ऊदरनिर्वाह करतात. फिर्यादी यांचे शेताचे शेजारी त्यांचे दिर जयवंत निवृत्ती पाटील यांची शेत जमिन व जनावरांचे गोठा असुन दोन्ही शेत जमिनीमध्ये समाईक बांध आहे. दिर जयवंत पाटील हे जमिनीची वाटनी झालेपासुन वाटणीचे कारणावरुन त्यांचे सोबत बोलत नाही व मनात राग धरुन असतात. दि.०८/०९/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास फिर्यादी त्यांचे माळ नावचे शेतात त्यांचे गावातील आकनाबाई बाबासाहेब कांबळे, बबीता भगवान कांबळे, निलाबाई भगवान कांबळे, वंदना संजु जगताप, आनंदी भ्गवान मिसाळ, विमल राजाराम कांबळे असे फिर्यादी यांचे शेतात ऊस पिकात भांगलीनी करीत होते. सायंकाळी ४.३० वाजता फिर्यादी यांचे शेतातील भांगलनीची सुट्टी झालेने फिर्यादी व तिचे सोबत असणा–या बायका त्यांचे शेताचे समाईक बांधावरुन घरी जात असताना फिर्यादीचे दिर जयवंत पाटील हे त्याचे जनावरांचे गोठयातुन तेथे येवुन तु माझे शेतात का तुडवा करीत आहे असे म्हणुन शिवीगाळ करु लागले म्हणुन फिर्यादी त्यास तुझे शेतातील ऊसाचे कोंब मोडले आहेत का हे दाखवतो ये असे म्हणालेवर दिर जयवंत पाटील याने गोठयातील शेण काढणेचे लाकडी फावडे घेवुन येवुन फिर्यादी त्यास ऊसाचे कोंब मोडलेले खाली वाकुन दाखवत असताना दिर जयवंत पाटील यांनी त्यांचे हातातील लाकडी फावडे फिर्यादीच्या पाठीत मध्यभागी मारले, तसेच फिर्यादीला पोटावरती डावे बाजुस लाथ मारुन तिला खाली

पाडले. त्यांचा वाद बघुन भांगलणीच्या बायका येवुन सोडवासोडव करु लागल्या तरीही दिर जयवंत पाटील यांनी फिर्यादीला मारहाण थांबवली नाही. तसेच जिवे ठार मारणेची धमकी देवु लागले. भांडणाचा आवाज ऐकुण फिर्यादीचे पती सरदार हे तेथे येवुन भांडण सोडवीत असताना दिर जयवंत पाटील यांनी फिर्यादीचे पती यांना ही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वाद ऐकुन शेजारील सचिन कांबळे व बाबासाहे मिसाळ, पंडीत पाटील व तेथील जमलेल्या लोकांनी सोडवा सोडव केली. त्यानंतर फिर्यादी यांनी पन्हाळा पोलीस ठाणेत आले. फिर्यादी व साक्षीदार यांना झाले मारहाणीबाबत उपचार करणेसाठी पोलीसांनी मेडीकल यादी दिलेने त्यांनी ग्रामीण रुग्णालयात पन्हाळा येथे उपचार घेवुन फिर्याद दिली.

**०३.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द पन्हाळा पोलीस ठाणे गु.र.क्र. १३०/२०२३ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४,३२३,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास सहाय्य फौजदार एम.एम. नाईक यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा नोंदवला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, सदर गुन्हयातील हत्यार जप्त करुन मुद्देमालात सामील केले, जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्र व इतर कागदपत्र प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०४.** आरोपीविरुध्द नि.क्र.७ नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२३,३२४,५०४,५०६ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला व आरोपीस दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.८ कडे नोंदविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एकुण चार साक्षीदारांचा साक्षीपुरावा तपासला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२४ कडे, जखमी सारीका सरदार पाटील व जखमी सरदार निवृत्ती पाटील यांचे एम.एल.सी. प्रमाणपत्र नि.क्र.२५ व २६ कडे मान्य केली. मुळ फिर्यादी यांचे पती की जे या कामात साक्षीदार आहे त्यांनी नि.क्र.२३ कडे पुरसीस दाख लकरुन आरोपी व त्यांच्यात कोर्टाबाहेर मिटले असुन सदर काम पुढे चालविणेचे नाही असे कळवले आहे. पुरेशी संधी दिलेनंतर तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन नि.क्र.१ कडील दि.२७/०३/२०२६ रोजीचे आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. तद्नंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.२७ कडे नोंदवले असता आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.०८/०९/२०२२ रोजी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी यांचे जमिनीमध्ये, देवठाणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे आरोपीने गुन्हयात हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यु होऊ शकेल अशा लाकडी फावडयाने फिर्यादी सारीका यांना इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादी सारीका यांना लाथाबुक्कयांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादींचा शिवीगाळ करुन उद्देशपुर्वक अपमानीत करुन त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केले व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ५०४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ५०६ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ५. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोषमुक्त करणेत येते. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ करीताः</u>**

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचे मुख्य

साक्षीदार क्र.१ सारीका सरदार पाटील **(फिर्यादी व जखमी/नि.क्र.११)** यांनी त्यांचे मौखीक पुराव्यात असे कथन केले आहे की, त्यांच्या कडे माळ रानाची शेती आहे त्यांच्या शेतालगत आरोपीची शेती आहे. त्यांच्या दोघांच्या शेतामध्ये सामाईक बांध आहे. सदर बांधावरुन त्यांच्यात व आरोपीमध्ये वादावादी आहेत. दि.०८/०९/२०२२ इ रोजी त्या त्यांच्या माळरानाच्या शेतात भांगलण्यासाठी गेल्या होत्या. त्यादिवशी त्यांच्यासोबत इतर बायका भांगलणेसाठी आल्या होत्या. सायंकाळी साडेचार वाजता डेअरीचा भोंगा होता त्यावेळी त्यांची शेतातील कामे आवरुन सुट्टी होते. सुट्टी झाल्यावर फिर्यादी व आरोपी हे त्यांच्या शेतामध्ये असलेल्या सामाईक बांधावरुन घरी येत होते. आरोपी हा तिला ऊसाचे कोंब मोडतेस काय या कारणावरुन शिवीगाळ करु लागला. त्यावर ती आरोपीस म्हणाली की, इकडे या, कुठे कोंब मोडले ते दाखवा. त्यावर आरोपी त्या ठिकाणी आला व आरोपीने त्यांच्या जनावराचे गोठयातील शेणाचे फावडयाने फिर्यादी वाकले असता तिच्या पाठीत मारले. त्यानंतर त्यांच्या दोघांच्यात झुंबड झाली त्यात फिर्यादी खाली पडली. आरोपीने त्याच्या गुडघ्याने तिच्या पोटात मारहाण केली. त्यावेळी तिच्या सोबत असलेल्या महिलांनी सोडवा सोडव करण्यास आल्या. शेजारच्या शेतात असलेले बाबासाहेब मिसाळ व पंडित पाटील हे त्या ठिकाणी आले व त्यांनी आरोपीस बाजुला नेले त्यावेळी तिचे पती देखिल त्या ठिकाणी आले. आरोपीने तिच्या पतीला देखील मारहाण केली. त्यानंतर ती पन्हाळा पोलिस स्टेशनला गेली व त्यांनी पन्हाळयात पोलीसांच्या सांगण्यावरुन सरकारी दवाखान्यात उपचार घेतले व त्यानंतर ते पोलीस स्टेशनला आले व आरोपी विरुध्द नि.क्र.१२ अन्वये फिर्याद दिली. आरोपीने फावडयाने मारले ते दाखवले ते (आर्टीकल अ) तेच आहे असे सांगितले. तसेच आरोपी न्यायालयात हजर आहे असे सांगितले.

**०९.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ आक्काताई बाबासाहेब कांबळे **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.१६)** व बबीता भगवान कांबळे **(प्रत्यक्षदर्शी**

**साक्षीदार/नि.क्र./नि.क्र.१७)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, या आरोपी जयवंत निवृत्ती पाटील यांना ओळखतात कारण ते त्यांच्या गावातील राहणारे असुन आरोपी न्यायालयात हजर आहेत. फिर्यादी सारीका सरदार पाटील हया त्यांच्या घरा शेजारी राहणेस असल्याने त्यांना त्या ओळखतात. दि.०८/०९/२०२२ रोजी फिर्यादी सारीका पाटील यांच्या शेतात त्या, अंजनी कांबळे, निला कांबळे, वंदना जगताप, आनंदी मिसाळ, विमल कांबळे इ. हजर होत्या. त्या त्यादिवशी सकाळी ११ वाजता फिर्यादीचे शेतात भांगलण्याकरीता गेल्या होत्या. सायंकाळी साडेचार च्या सुमारास त्यांची कामावरुन सुट्टी झाली होती. सुट्टी झाल्यानंतर त्या व बबीता कांबळे भाजी तोडण्यासाठी पाठीमागे थांबल्या होत्या. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये शेतातील ऊसाच्या लागणीचे कोंब तुडविल्याच्या कारणावरुन वाद झाले. त्यावर फिर्यादी तुम्हाला म्हणाली की, आम्ही तुमच्या शेतातील कोंब मोडलेल नाहीत, आम्ही आमच्या बांधावरुन ये जा करत आहोत. हे ऐकताच आरोपी त्याच्या जनावराच्या शेडातुन जनावरांचे शेण ओढत्याला फावडे घेवुन आला व आरोपीने फिर्यादीच्या पाठीत फावडयाने मारले. त्यानंतर त्यांनी त्यांना आडवाआडवी केली व त्या त्यांच्या घरी निघुन गेल्या. साक्षीदार आक्काताई बाबासाहेब कांबळे घटनेबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला कोणी दिली या विषयी तिला माहिती नाही असे सांगितले तर साक्षीदार बबीता भगवान कांबळे यांनी घटनेबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला सारीकाने दिली. तसेच फिर्यादीने वैदयकीय उपचार घेतल्याचे त्या सांगू शकल्या नाहीत. ज्या फावडयाने आरोपीने फिर्यादीला मारहाण केली ते (आर्टीकल अ) वर दाखल असलेले फावडे दाखवले असता ते तेच आहे असे सांगितले.

१०. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ सरदार निवृत्ती पाटील **(जखमी साक्षीदार/नि.क्र.२२)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, सारीका सरदार पाटील ही त्यांची पत्नी असुन ती फिर्यादी आहे. सन २०२२ साली ते माळाची शेती या शेत मिळकतीत काम करायला गेले होते. आरोपी जयवंत निवृत्ती पाटील हा त्याचा

सख्खा भाऊ आहे. दि.०८/०९/२०२२ रोजी सकाळी तो व त्याची पत्नी शेतात गेली होती. त्यांची पत्नी एका शेतात होती व तो दुस–या शेतात गेला होता. त्या दिवशी काय घटना घडली या विषयी त्याला माहिती नाही. असे काही घडले नाही की, आरोपीने त्याची भावजये सारीका हिला ती बांधावरुन जात असताना शिवीगाळ केली व तिला लाकडी फावडयाने मारहाण केली व तसेच तिला देखील लाथाबुक्यांनी मारहाण केली. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केलेले नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलटतपासामध्ये विचारतात तसे प्रश्न विचारुन देखील आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होईल असा सबळ पुरावा अभिलेखावर आला नाही.

**११.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

**१२.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ सारीका सरदार पाटील **(फिर्यादी/नि.क्र.११)** यांनी आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे आले आहे की, घटना ४.३० वाजता घडल्यानंतर ते ६ च्या सुमारास पन्हाळा पोलीस स्टेशनला गेले. पोलीसांनी त्यांनी सांगितलेली माहिती लिहून घेतली. फिर्याद लिहून घेतल्यानंतर उपचाराकामी पोलीसांनी त्यांना सरकारी दवाखाना पन्हाळा येथे पाठवले. सरकारी दवाखाना पन्हाळा येथून आल्यानंतर त्यांनी पुन्हा दुसरी फिर्याद दिली. माळरानच्या शेतात त्यांचा गोठा आहे. आर्टिकल अ वर दाखल असलेल्या फावडयावर कोणत्याही खाना खुना नाहीत. त्यांचे माळरानाचे शेत पश्चिमेकडून पूर्वेकडे असून ते उतार वळणाचे आहे. पश्चिमेच्या बाजूला आरोपीचे शेत आहे. त्यांचे शेत उतारास आहे. ज्या जागेवर शेतीला उतार आहे त्या जागेच्या ठिकाणी चढावर असणारा शेतकरी बांध

घालतो तसा आरोपीने बांध घातला होता. त्यांचे व आरोपींचे उसाचे एक दिड महिन्याची लागण होती. त्यांच्या रानमाळाच्या शेताच्या उत्तरेस देवठाण येथे कसबा ठाणे जागेचा रस्ता असून तो डांबरीचा आहे. रानमाळाची शेती ही त्यांची वाडवडिलार्जित शेती आहे. रानमाळाच्या पूर्वेस बी.एस.पाटील यांचे गु–हाळ किंवा घाना साईट आहे. रस्त्यापासून ते सामाईक विहीरीपर्यंत जाण्याकरीता त्यांच्या व आरोपींच्या शेतातून वाट ठेवलेली आहे. सदर रस्त्यावरून बैलगाडी किंवा ट्रॅक्टर जावू शकतो. त्यांचे सासरे यांनी विष्णू जगताप यांना १२ गुंठे क्षेत्र विकले आहे. वाटप होण्याच्या आधी त्यांच्या सास–यांनी काही जमिनी विकलेल्या आहेत. त्यांचे लग्न झाल्यानंतर त्यांच्या सास–यांनी ट्रॅक्टर विकलेला आहे. प्रभाकर व संकेत ही त्यांची मुले असून पियुष हा जयवंतचा मुलगा आहे. फिर्यादीचा मुलगा प्रभाकर यांनी जयवंतला मारहाण केली म्हणून त्यांनी त्यांच्या पतीवर व त्यांच्या मुलांविरूध्द पन्हाळा पोलीस स्टेशनमध्ये केस केली होती. त्यांच्या नि. १२ च्या फिर्याद मध्ये आरोपींनी त्यांना गुडघ्याने मारहाण केली असे नमूद नाही. त्यांनी सरकारी दवाखान्यात उपचार घेतल्यानंतर दुस–या कोणत्याही दवाखान्यात उपचार घेतले नाहीत. ते जुने घर व नवीन घर दोन्ही घरे वापरतात. त्यांच्या सासू–सास–यांच्या जमिनी फिर्यादी कसते. त्यांच्या सास–यांनी जयवंतला दिलेल्या जमिनी ते कसत आहेत.

**१३.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ आक्काताई बाबासाहेब कांबळे **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.१६)** व अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.३ बबीता भगवान कांबळे **(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/नि.क्र.१७)** यांनी आरोपीचे विधीज्ञांनी नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे आले आहे की, त्यांचे सारिका सोबत चांगले संबध आहेत. त्या व बबीता कांबळे अशा मिळून फिर्यादीच्या शेतात भांगलायला गेल्या होत्या हे दाखवणारा पुरावा त्यांच्याकडे नाही. त्या न्यायालयात बबीता व सारिका सोबत आल्या आहेत. तसेच फिर्यादी सारिकाच्या सांगण्यावरून त्या जबाब देत आहेत. पोलीसांनी त्यांची तपास टिपण्णे घटनेच्या पाच दिवसांनी नोंदवले. घटनेबाबत त्यांनी पाच

दिवसांत कोणालाही कसलीही माहिती दिली नाही. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदवून घेतला नाही. फिर्यादीचे पती घटनेच्या वेळी दुस–या शेतात काम करायला गेले होते. ते घटना घडत होती त्यावेळी घटनास्थळावर हजर नव्हते. आरोपी जयवंतचे शेत उंचावर असून फिर्यादी सारिकाचे शेत सखल भागावर आहे. उंचावर शेत असलेला शेतकरी त्यांच्या शेतातील पाणी, माती वाहून जावू नये म्हणून बांध घालत असतो. सदर वाफयामध्ये आरोपीनी लागण केली होती. सदर लागणीचे एक ते दिड फुट असे कोंब आले होते. सदर लागणीवर येता जाता पाय पडल्यास ती मोडू शकते आलेल्या लागणीला पायाच्या माध्यातून तुडवा झाल्यास सदर लागणीचे नुकसान होते ही बाब चुकीची आहे. सारिकाच्या गोठयात देखील अशाच स्वरूपाचे फावडे आहे कारण सारिका कडे देखील जनावरे आहेत. फिर्यादींची मुले व आरोपींची मुले यांचयात जमिनीच्या कारणावरून वाद आहेत.

१४. एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्रं. १ फिर्यादी यांनी त्यांच्यात व आरोपींमध्ये जमिनीच्या कारणावरून वाद असल्याचे सांगितले. त्याचबरोबर वाटपाच्या अगोदर सर्व जमिनी त्यांच्या सास–यांच्या नावे होत्या. वाटप होण्यापूर्वी काही जमिनी त्यांच्या सास–यांनी विकलेल्या आहेत. त्यांचे लग्न झालेनंतर त्यांच्या सास–यांनी ट्रॅक्टर विकलेला आहे. फिर्यादीने नि. १२ वरील फिर्याद दाखल केली त्यावेळी फिर्यादमध्ये आरोपींनी त्यांना गुडघ्याने मारहाण केली असे नमूद नाही. सरकारी दवाखान्यात उपचार घेतल्यानंतर दुस–या कोणत्याही दवाखान्यात त्यांनी उपचार घेतले नाहीत असे कबुल केले. साक्षीदार क्रं. २ व ३ हया फिर्यादीच्या मैत्रिणी असून केवळ फिर्यादीच्या सांगण्यावरून त्यांनी साक्ष दिली असून आर्टिकल अ वर दाखल असलेले फावडयासारखेच फावडे सारिकाच्या गोठयात देखील आहे अशी दोघींनी कबुली दिली. त्याचबरोबर फिर्यादी व आरोपी यांच्यात जमिनीच्या कारणावरून वाद असून त्यांच्यात

दावे न्यायप्रविष्ठ आहेत ही बाब दोघींनी उलटतपासामध्ये कबुल केली असल्याने सदर वादांची उत्पत्ती म्हणजेच प्रस्तुतची केस असल्याचे स्पष्ट होते. एकंदरीत अभिलेखावर दाखल असलेला पुरावा हा आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरीता अपुरा असल्याने त्याचा फायदा निश्चितच आरोपीच्या पक्षास जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **प्रश्नबिंदू क्रं.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवते.**

**प्रश्नबिंदू क्र.५ करीताः**

**१५.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ४ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३२३,३२४, ५०४, ५०६ अन्वये आरोपीवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल बांबूची काठी या अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे त्यांचा नाश करण्यात यावा. सबब, प्रश्नबिंदू क्र.५ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**आदेश**

१. आरोपी जयवंत निवृत्ती पाटील, रा. देवठाणे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४, ५०६ चे अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

४. जप्त मुद्देमाल एक बांबुचा दांडा अंदाजे एक मिटर (२९ इंच) लांबीचा

चार पेरे असलेला त्याला टोकाला अंदाजे १० x ८.५ इंच लांबी रुंदीची लाकडी फळी असलेली हिचा अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by VAISHALI
Date: 2026.05.11 18:38:36 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दिनांक – ११/०५/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे. कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर